# मुंबई विद्यापीठ

तात्काळ/अति–महत्वाचे

क्र. मशिमाक/ ०७ /२०२२-२०२३

विषय:– <u>विधानपरिषद तारांकीत प्रश्न क्र. ४६०५२</u>
सीए, सी.एस. झालेले प्राध्यापक पदोन्नतीपासून वंचित असल्याबाबत..

संदर्भ:–१) विससं/उशि/कोविप/मवि/२०२२/१८१४ दिनांक २८/०७/२०२२
२) युएनआय/(७४/२२)/विशि–१ ७५७७ दिनांक १३ जुलै, २०२२ .

<u>परिपत्रक</u> :–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय व अशासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि समाजशास्त्र, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल, यांच्या उपरोक्त पत्र क्र. १ व त्यासोबत प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पूणे यांच्या पत्रामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १५ एप्रिल, २०२१ च्या पब्लीक नोटीसमध्ये खालील बाब नमुद करण्यात आलेली आहे, असे कळविण्यात आलेले आहे.

**CA/CS/ICWA qualification be considered equivalent to PG Degree.**

**सदरची तरतूद ही दि. १५ एप्रिल, २०२१ च्या पब्लिक नोटीसमध्ये प्रसिद्ध झालेली असल्यामुळे CA/CS/ICWA या शैक्षणिक अर्हतेच्या आधारे १५ एप्रिल, २०२१ पूर्वी आपल्या विभागामध्ये अध्यापकांच्या नियुक्त्या/पदोन्नत्या झालेल्या आहेत काय, याबाबतची माहिती तात्काळ या संचालनालयास सादर करावी. तसेच जर दि. १५ एप्रिल, २०२१ पूर्वी CA/CS/ICWA qualification च्या आधारे अध्यापकांच्या नियुक्त्या/पदोन्नत्या झालेल्या असतील तर ज्या अध्यापकांच्या नियुक्त्या झालेल्या आहेत त्यांची माहिती देण्यात यावी. तसेच सदरच्या नियुक्त्या/पदोन्नतीच्या वेळेस कोणते नियम अस्तित्वात होते, याबाबतची माहिती तात्काळ या संचालनालयास सादर करावी.**

उपरोक्त बाबीच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, वर पत्रात नमूद केल्यानुसार माहिती अधिवेशनात सादर करावयाची असल्याने आपल्या महाविद्यालयातील माहिती महाविद्यालयीन शिक्षक नियुक्ती व मान्यता कक्षाच्या <u>concolsection@gmail.com</u> या ईमेल आयडीवर सोबत जोडलेल्या तक्त्यात भरून त्वरीत सादर करण्यात यावी, ही विनंती.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :- ०४ ऑगस्ट, २०२२

(डॉ. विनोद पाटील)
प्रभारी कुलसचिव

Scanned with CamScanner

महाविद्यालयाचे नाव :-

| अनु. क्र | अध्यापकाचे नाव | शैक्षणिक अर्हता | नियुक्ती दिनांक | विद्यापीठ मान्यता पत्र |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

Scanned with CamScanner